नाशिक
दि. १६/१०/२०१९

# प्रेसनोट

## आलोसे महेंद्र बबनराव देवळीकर, जिल्हा हिवताप अधिकारी, जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय नाशिक, ता.जि.नाशिक यांना १५,०००/— रूपये लाचेची रक्कम स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक यांनी केलेली कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | कार्यवाही चालु आहे. |
| कलम | लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ (संशोधन सन २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपींचे नांव व कार्यालय | महेंद्र बबनराव देवळीकर, जिल्हा हिवताप अधिकारी, जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय नाशिक. |
| मागणी कलेली लाचेची रक्कम | २०,०००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १५,०००/— रुपये पहिला हप्ता म्हणुन |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे सन—१९८६ ते १९९२ या कालावधीमधील एक वेतनवाढ कमी दिली गेल्याचे तक्रारदार यांचे सेवानिवृत्तीचे वेळी सन २०१३ मध्ये झालेल्या वेतन पडताळणीमध्ये निर्दशनास आल्याने सदर वेतन फरकाचे बिल जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय नाशिक येथे मंजुर करण्यासाठी तक्रारदार यांनी सादर केले होते. सदर बिल मंजुर करण्यासाठी आलोसे महेंद्र बबनराव देवळीकर, जिल्हा हिवताप अधिकारी, जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडे २०,०००/—रुपये लाचेची मागणी केल्याने, तक्रारदार यांनी आज दि.१६/१०/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिल्यामुळे सदर तक्रारीवरुन ला. प्र.वि.नाशिक पथकाने सापळापुर्व पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान आलोसे महेंद्र बबनराव देवळीकर यांनी तक्रारदार यांचेकडे २०,०००/—रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी पहिला हप्ता म्हणुन १५,०००/—रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय नाशिक येथे स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक कार्यालयात संपर्क करावा.

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक कार्यालय
संकेतस्थळ : acbmaharashtra.gov.in
ई—मेल : spacbnasik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार/ॲप्लीकेशन : acbmaharastra.net
टोल फ्री क्र. : १०६४
दुरध्वनी क्र. : ०२५३—२५७५६२८, २५७८२३०
व्हॉटस ॲप क्र. : ९९३०९९७७००

16.10.19

( दिनकर पिंगळे )
वाचक पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता